## म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.१९/२०२३ मधील निशाणी ०५ वरील अंतरीम पोटगीचा आदेश (शीतल रोहित कुचेकर वि. रोहीत संजय कुचेकर) (CNR No.MHPU170016262023)

१. सदरचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, कलम २३ अन्वये सामनेवाला क्र.१ कडून अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. **अर्जदार यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –**

अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक ०५/०३/२०२१ रोजी झाला. विवाहाचा संपूर्ण खर्च अर्जदाराच्या वडीलांनी केला. विवाहानंतर सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. अर्जदारास सकाळी लवकर उठून घरातील सर्व कामे करावी लागत असत. घरातील प्रत्येकासाठी गरम पाणी, स्वयंपाक, नाश्ता इत्यादी सर्व अर्जदार एकटी करत असून तिला कोणीही मदत करत नसे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदारास कोठेही घेवून जात नसून केवळ घरात मोलकरणीसारखी वागणूक देत असे. अर्जदाराने तिला होणा–या त्रासाबाबत तिच्या आई–वडीलांना सांगयायचा प्रयत्न केल्यावर सामनेवाला यांनी तिला विषारी औषध देवून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सामनेवाला अर्जदाराकडून पैशाची मागणी करीत असत. दि.०२.०२.२०२३ रोजी सामनेवाला यांनी अर्जदारास मारहाण करुन अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेतले. सामनेवाला हे अर्जदाराच्या माहेरहून रक्कम रु.२,००,०००/– ची मागणी करत. माहेरहून पैसे आणण्यासाठी सामनेवाला यांनी अर्जदारास घरातून हाकलून दिले आहे. तेव्हापासून अर्जदार तिच्या माहेरी राहते.

अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला क्र.१ हा नोकरीस असून त्याला दरमहा ६० ते ७० हजार रुपये पगार आहे. सामनेवाला क्र.२ हा रॉकेल विक्रीचा व सामनेवाला क्र.४ हा जमीन व प्लॉट विक्रीचा व्यवसाय करतात. सामनेवाला क्र.५ देखील नोकरीस आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ कडून अर्जदारास दरमहा रक्कम रु.२५,०००/– अंतरीम पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदार हिने केली आहे.

३. **सामनेवाला क्र.१ यांनी निशाणी १४ येथे म्हणणे दाखल केले आहे ते खालीलप्रमाणे–**

अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या विवाहाचा संपूर्ण खर्च हा सामनेवाला क्र.२ व ३ यांनी केला. विवाहानंतर अर्जदार घरातील कोणतेही काम न करता मोबाईलवर तासंतास बोलत बसायची. घरातील सर्व कामे सामनेवाला क्र.३ व ५ करायचे. अर्जदाराने सासरच्या लोकांची कोणतीही जबाबदारी उचललेली नाही. सामनेवाला क्र.३ आजारी असतानादेखील अर्जदाराने तिची कोणतीही काळजी घेतली नाही. अर्जदारास सतत माहेरी जाउन राहण्याची सवय आहे. अर्जदाराचे शिक्षण १० वी झाले आहे असू सांगून अर्जदाराने सामनेवाला क्र.१ ची फसवणूक केली आहे. अर्जदाराचा भाउदेखील सामनेवाला क्र.१ ला धमकवायचा व त्रास देत. सामनेवाला क्र.२ ते ५ यांच्यापासून वेगळे राहण्यासाठी अर्जदार सतत सामनेवाला क्र.१ ला त्रास देत असे. दि.११.०५.२०२३ रोजी सामनेवाला क्र.१ ते ५ अर्जदाराला सासरी घेवून येण्यासाठी अर्जदाराच्या माहेरी गेले असता अर्जदार व तिच्या घरच्यांनी सामनेवाला यांना घरात कोंडून मारहाण केली आहे.

सामनेवाला क्र.१ हा नोकरीस असून त्या नोकरीच्या पगारातून त्याला घर खर्च करावा लागतो. सामनेवाला क्र.२ ते ५ हे सामनेवाला क्र.१ वर अवलंबून आहेत. अर्जदाराच्या वडीलांची शेती असून अर्जदाराचा भाउ दुधाचा व्यवसाय करतो. अर्जदार स्वतः खाजगी कंपनीत नोकरीस असून तिला दरमहा रक्कम रु.१५,०००/– पगार आहे. त्यामुळे अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती सामनेवाला क्र.१ यांनी केली आहे.

**४.** उभय पक्षांच्या कथनांवरुन खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे –

| **अ.क्र** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | **होय.**<br>**दरमहा र.रु.३,०००/–** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार.** |

**– का र ण मि मां सा –**

**५.** अर्जदारातर्फे युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र.१ विरुद्ध युक्तीवाद नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

६. महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करु शकेल या हेतुने केली आहे.

७. प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झाला आहे याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही.

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

८. अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्वप्रथम अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, सामनेवाला क्र.१ ते ५ हे तिला घरातील सर्व कामे करायला भाग पाडत, तिच्या माहेरहून पैशाची मागणी करत, तिला शिवागाळ व मारहाण करत असत. याउलट, सामनेवाला क्र.१ चे असे कथन आहे की, अर्जदार ही विवाहानंतर सासरच्या कोणत्याही जबाबदा–या उचलत नसे व तिला विनाकारण माहेरी जावून राहण्याची सवय आहे.

९. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या कथनांचे अवलोकन करता, त्यांनी एकमेकांवर अनेक आरोप प्रत्यारोप केल्याचे दिसुन येते. परंतु, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी एकमेकांवर केलेले आरोप व प्रत्यारोप यावर त्या दोघांनाही पुराव्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही भाष्य करणे योग्य ठरणार नाही. अर्जदाराने अर्जात केलेल्या भाष्यावरुन प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या अर्जात सामनेवाला क्र.१ ते ५ यांनी तिला दिलेली वागणूक तिने नमुद केली आहे. संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवालात देखील अर्जदाराला झालेल्या हिंसाचाराच्या घटना तारखेनिशी नमुद आहेत. तसेच अर्जदाराने निशाणी ३/३ व ३/४ येथे दाखल केलेल्या तक्रारींचे अवलोकन करता अर्जदाराने सामनेवाला क्र.१ ते ५ कडून तिला होणा–या त्रासाबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केल्याचे दिसते. कोणतीही स्त्री गंभीर कारण नसताना तिच्या सासरच्या व्यक्तिंविरुद्ध पोलिस स्टेशनला अगर न्यायालयात दाद मागायला येणार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला

सामोरे जावे लागले आहे हे स्पष्ट होते.

**१०.** अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन नसेल तर सामनेवाला क्र.१ याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते.

**११.** अर्जदाराने तिच्या अर्जात ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. सामनेवाला क्र.१ च्या कथनानुसार अर्जदार नोकरीस असून तीला दरमहा रक्कम रु.१५,०००/– पगार आहे. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा सामनेवाला क्र.१ ने दाखल केला नाही. अर्जदाराने दिलेल्या मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्रात देखील ती कमावती असल्याचा उल्लेख नाही. त्यामुळे अर्जदार कमावती नाही हे स्पष्ट होते.

**१२.** अर्जदार ही कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्याची सामनेवाला क्र.१ ची जबाबदारी असल्याने सामनेवाला क्र.१ कमावता आहे का हे पाहणे गरजेचे ठरते. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ हा नोकरीस असून त्याला दरमहा ६० ते ७० हजार रुपये पगार आहे. सामनेवाला क्र.२ हा रॉकेल विक्रीचा व सामनेवाला क्र.४ हा जमीन व प्लॉट विक्रीचा व्यवसाय करतात. सामनेवाला क्र.५ देखील नोकरीस आहे. परंतु अर्जदाराने सामनेवाला क्र.१ व ५ यांच्या नोकरीबाबत अगर सामनेवाला क्र.२ व ४ यांच्या व्यवसायाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवाला क्र.१ ने मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र देखील दाखल केले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ च्या निश्चित उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. परंतु सामनेवाला क्र.१ ने प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये तो नोकरीस आहे ही बाब मान्य केली आहे. यावरुन सामनेवाला क्र.१ हा कमावता आहे हे शाबीत होते.

**१३.** सामनेवाला क्र.१ कडे उत्पन्नाचे साधन असलेने अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही सामनेवाला क्र.१ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून पोटगीची किती रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे बघणे आवश्यक ठरते.

**१४.** अर्जदार ही दि.०२.०२.२०२३ पासून माहेरी राहते. तेव्हापासून आजपर्यंत सामनेवाला क्र.१ ने तिच्या उदरनिर्वाहाकरीता तिला कोणतीही रक्कम दिलेली नाही. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरीता व दैनंदिन गरजा भागविण्याकरीता अंतरीम पोटगी म्हणून सामनेवाला क्र.१ ने

अर्जदारास दरमहा र.रु.३०००/– देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते.

**आ दे श –**

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.३,०००/– (रु.तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून द्यावेत. |
| ३. | अर्जदार हिने पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा. |
| ४. | अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसून आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल. |
| ५. | खर्चाबाबत आदेश नाही. |
| ६. | आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना मोफत देण्यात यावी. |

स्वाक्षरी/–
**(प्रा. रा. सबनीस)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे.

दि. १८/१०/२०२४

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. File are same word for word as per original."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Madgundi S.A. |
| Court Name | : | Prajakta R. Sabnis<br>Jt.CJJD. & JMFC, Indapur,<br>Dist.Pune. |
| Date | : | 18-10-2024 |
| Order signed by presiding officer on | : | 18-10-2024 |
| Order uploaded on | : | 18-10-2024 |